हिंदुस्थान
akolahindu@gmail.com
अकोला जिल्हा विशेष
मंगळवार, दि. २४ मार्च २०२०

थोडक्यात महत्त्वाचे

उभ्या ट्रक मधील हरभरा डाळीचे २३८ कट्टे लंपास

बाळापूर - पेट्रोल पंपावर उभ्या असलेल्या ट्रक मधून तीन लाख रुपये किमतीचे हरभऱ्याच्या डाळीचे २३८ कट्टे अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची घटना शनिवारी सकाळी उघडकीस आली. या प्रकरणी बाळापूर पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. प्राप्त माहितीनुसार शुक्रवारी रात्री राष्ट्रीय महामार्गावरील इंडियन ऑईल पेट्रोल पंपावर ट्रक चालक राहूल प्रकाश इंगळे या चालकाने एमएच २८ एबी ८५५५ हा ट्रक उभा केला व वाहकासह दोघेही झोपून गेले. या ट्रक मध्ये रविन्द्र दालमीलचे हरभरा डाळीचे कट्टे घेऊन ते डडीसा येथे निघाले होते. शुक्रवारी पंपावर थांबले होते. चालक - वाहकांना झोप लागल्या नंतर मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी ट्रकची ताडपत्री फाडून त्यामधील २३८ कट्टे डाळीचे कट्टे लंपास केले. प्रत्येकी ३० किलो वजन असलेले कट्टे तीन लाख ३२ हजार दहा हजार रुपयांचे आहेत. शनिवारी सकाळी चालक झोपेतून उठल्यानंतर त्यांना हा प्रकार उघडकीस आला.

गावागावात अलगीकरण कक्ष स्थापन करण्याचे आदेश

प्रतिनिधी, २३ मार्च

मुर्तिजापूर - तालुक्यातील शेकडो लोक खाजगी नोकरी, शासकीय नोकरी तसेच व्यवसाय व इतर कामाकरिता ईतर राज्यात व विविध शहरात आहेत. सद्यस्थितीत कोरोना व्हायरसच्या संक्रमणाचा धोका ओळखून सर्वत्र बंद पुकारण्यात आल्याने शेकडो नागरिक तालुक्यात परत आलेले आहेत. वेगवेगळ्या महानगरातून आलेल्या नागरिकांची तपासणी मुर्तीजापुर येथील उपजिल्हा रुग्णालयात करण्यात येते आहे. यामध्ये एका दुबईवरून आलेल्या इसमाचा देखील समावेश आहे. महाराष्ट्र ल्त्याइतरराज्यातून व शहरातून परत येणाऱ्या नागरिकांची तपासणी मुर्तीजापुर उपजिल्हा रुग्णालयात केल्या जात आहे. या ठिकाणी अलगीकरण (आयसोलेशन) कक्षाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. यामध्ये ताप, खोकला, दम लागणे असे लक्षण आढळल्यास या ठिकाणी तपासणी केल्या जाते. त्यानंतर काही शंका वाटल्यास पुढील उपचारासाठी अकोला येथे रवानगी करण्यात येते. परंतु विदेशातून आलेल्यांना मात्र थेट अकोला येथे रवाना केल्या जात आहे. लोकांनी घरीच कोरोंटाईन करावे, लोकांनी घरी थांबावे, बाहेर पडु नये असे श्रीमती लक्ष्मीबाई देशमुख उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. नेमाडे यांनी सांगितले.

तर कोरोना व्हायरसचे संक्रमण होऊ याबाबत व्यापक प्रमाणात काळजी घेण्यात येत असून याचाच भाग म्हणून आता गावागावात अलगीकरण (आयसोलेशन) कक्ष स्थापन करण्याचे आदेश देण्यात आल्याचेही सांगण्यात आले. ग्रामसेवक, तलाठी, आशा कर्मचारी, आरोग्य सेवक, सेविका, अंगणवाडी सेविका यांचे पथक राहणार आहे. या पथकाद्वारे बाहेरून गावात येणाऱ्या लोकांना १४ दिवस अलगीकरण कक्षात ठेवण्यात येऊन लक्ष ठेवण्यात येणार आहे. अलगीकरण कक्षासाठी पाण्याची व विजेची व्यवस्था ग्रामपंचायतचे सरपंच, गावातील पोलीस पाटील यांच्या सहकार्याने केली जाणार आहे. अलगीकरण कक्षामध्ये दिवस बाहेरगावाहून आलेल्या लोकांना १४ दिवस ठेवण्यात येणार असल्याची माहिती तालुका आरोग्य अधिकारी डॉ. रामचरण राठोड यांनी दिली. तहसीलदार, तालुका आरोग्य अधिकारी व बिडीओश्यांची समिती स्थापन करण्यात आली आहे. याबाबत प्राप्त आदेशानुसार गावागावात अलगीकरण कक्ष स्थापन केले जाणार आहेत. चौदा दिवस पर्यंत काही लक्षण आढळून आल्यास त्याबाबत प्राथमिक आरोग्य केंद्रात तपासणी केल्या जाईल. यामध्ये काही शंका असल्यास अशा रुग्णांना अकोला येथे दाखल करण्यात येईल. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, घाबरू नये काही शंका असल्यास चौकशी करावी, सतर्कता बाळगावी असेही डॉक्टर राठोड यांनी सांगितले.

बाळापूरात जनता कर्फ्यूला मिळतोय चांगला प्रतिसाद

प्रतिनिधी, २३ मार्च

बाळापूर - जगभरात थैमान घालणाऱ्या कोरोना विषाणूचा वाढता प्रभाव रोखण्यासाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २२ मार्च रोजी देशभरात स्वयंस्फूर्तीने जनता कर्फ्यू पाळण्याच्या आवाहनाला येथुन जवळच असलेल्या मात्र शेगाव तालुक्याअंतर्गत येत असलेल्या तरोडा(कसबा) या गावात जनतेने उस्फुर्त प्रतिसाद दिला आहे. गावातील बाजारपेठ पूर्णता बंद ठेवण्यात आली. शनिवारी तरोडा (कसबा) येथे सरपंच संगीता सिरसाट, उपसरपंच विशाल खंडारे, तंटामुक्ती अध्यक्ष विनायक खंडारे, ग्रामसेवक कळमसेरे मॅडम,



पोलीस पाटिल सुकेशनी सुभेदार तेलगोटे, ग्राम पंचायतचे सर्व सदस्य, ग्रामपंचायतचे शिपाई यांनी शनिवारी गावात फिरून दवंडी देऊन रविवारी जनता कर्फ्यूला सहकार्य करण्याचे आवाहन केले होते. त्याप्रमाणे तरोडा (कसबा) येथील समस्त गावकरी मंडळींच्या सहकार्याने तरोडा (कसबा) हे गाव कडकडीत बंद करण्यात आले होते.

महापौर यांनी स्वच्छता कर्मचारी यांना रूमाल व हॅण्ड ग्लोजचे वितरण

प्रतिनिधी, २३ मार्च

अकोला - कोरोनाच्या पार्श्वभुमिवर अकोला महानगरपालिका क्षेत्रातील स्वच्छतेचे काम करणारे अँपे चालक व स्वच्छता कर्मी यांना त्यांच्या कार्यक्षेत्रावर जाउन महापौर सौ. अर्चना जयंत मसने यांच्या हस्ते कॉटनचे रूमाल व हॅण्ड ग्लोसचे वितरण करण्यात आले आहे. यावेळी आरोग्य विभाग प्रमुख प्रशांत राजुरकर, आरोग्य निरीक्षक शैलेश पवार, नितीन नागलकर यांचेसह स्वच्छता कर्मचा-यांची उपस्थिती होती.

अकोला जिल्ह्यात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव होउ नये यासाठी शहरातील नागरिकांनी कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव होउ नये यासाठीच्या शासनाने निर्गमित केलेल्या सर्व उपाययोजनांचा काटेकोरपणे पालन करण्याचे आवाहन केंद्रीय राज्य मंत्री मा.ना.अॅड. संजयजी धोत्रे, आमदार गोवर्धनजी शर्मा, आमदार रणधीर सावरकर व भाजपा शहर अध्यक्ष विजय अग्रवाल यांनी केले आहे.

देगाव येथे ७६ नागरिकांची कोरोना तपासणी

प्रतिनिधी, २३ मार्च

बाळापूर - तालुक्यातील देगाव येथील ७० नागरिक देवदर्शनासाठी अयोध्या आणि काशी येथे गेले होते. आगामी काळात कोरोना चा धोका पाहता अयोध्या व काशी येथून परतलेल्या आणि मुंबई व पुणे येथून आलेल्या ७६ नागरिकांची कोरोना तपासणी जिल्हा परिषद सदस्य राम गव्हाणकर यांच्या प्रयत्नामुळे शनिवारी सकाळी वाडेगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्य पथकाद्वारे करण्यात आली. देगाव येथील ६० ते ७० वर्ष वयोगटातील ७० नागरिक अयोध्या व काशी येथे दर्शनासाठी गेले होते. तसेच काही नागरिक मुंबई व पुण्यावरून गावात पोहचले आहेत. ग्रामीण भागात कोरोना विषाणू संदर्भात नागरिकांनी घाबरून न जाता प्रादुर्भाव रोखण्यासाठी सतर्कता म्हणून बाळापूर तालुक्यातील देगाव येथील ७० नागरिकांची कोरोना तपासणी करण्याची मागणी जिल्हा परिषद सदस्य राम गव्हाणकर यांनी

जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडे केली शुक्रवारी केली होती. या मागणीची तात्काळ दखल घेत या ७० नागरिकांना अकोला येथे न आणता वाडेगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात शनिवारी आरोग्य विभागाच्या तपासणी पथकाने वाडेगाव येथे ७६ नागरिकांची तपासणी केली. यावेळी नागरिकांचे नमुने घेण्यात आले. यावेळी जिल्हा परिषद सदस्य राम गव्हाणकर, सरपंच झाकर्डे, पंचायत समिती सदस्यपती रामकृष्ण सोनटक्के, अफसरभाई प्रामुख्याने उपस्थित होते. या तपासणी पथकात तालुका आरोग्य अधिकारी डॉ. भावना हाडोळे, डॉ. चुनडे, डॉ. घुगे, डॉ. हर्षाली ताडे, डॉ. डीपके, डॉ. तोसिफ खान, सुनील कोल्हे, कैलास गायकी, आरोग्य सहायक पवार, राठोड, उबाळे, आरोग्य सेवक रणवीर, भिसे, खंडारे, ताथडे, आरोग्य सेविका चव्हाण, कांगणे, जंजाळ, गटप्रवर्तक मानकर आणि परिचर यांचा सहभाग होता.

मनपा कर्मचाऱ्यांची थर्मल स्कॅनींग

प्रतिनिधी, २३ मार्च

अकोला - कोरोनाच्या पार्श्वभुमिवर मनपा आयुक्त संजय कापडणीस यांच्या आदेशान्वये मनपा आरोग्य विभागाव्दारे मनपाच्या प्रवेश व्दारावर आज मनपा पदाधिकारी, स्थायी समिती सभापती सतीष ढगे, गटनेता राजेश मिश्रा आदि अधिकारी /कर्मचारी तसेच मनपात येणा-या नागरिकांची

थर्मल स्कॅनींग मशीनव्दारे चाचणी करण्यात आली.

मनपा कर्मचाऱ्याची संख्या ५ टक्के- आयुक्त

प्रतिनिधी, २३ मार्च

अकोला - कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महाराष्ट्र शासनाने राज्यात कलम १४४ लागू केली आहे. त्या अनुषंगाने अकोला महानगरपालिका अधिनस्त कार्यरत असलेले सर्व विभाग प्रमुख/क्षेत्रीय अधिकारी यांनी अत्यावश्यक सेवेतील कर्मचारी जसे, अग्निशमन, वैद्यकीय आरोग्य, मलेरिया, आरोग्य (स्वच्छता), विद्युत, जलप्रदाय, विभागातील कर्मचारी वगळता उर्वरित कार्यालय संपुर्णपणे बंद न ठेवता त्या विभागातील कार्यालयीन व ईतर कर्मचारी यांचेमधून केवळ ५ टक्के आवश्यक कर्मचा-यांना आळी-पाळीने कामकाजात सहभागी करून घ्यावे. त्यामध्ये विभाग प्रमुख/क्षेत्रीय अधिकारी त्यांचे प्रमुख सहाय्यक आणि चपराशी यांचा समावेश असावा व ईतर कर्मचारी घरी राहूनच कार्यालयीन कामकाज करतील तसेच आपला भ्रमणध्वनी बंद राहणार नाही याची दक्षता घेणे बाबत त्यांना सुचना संबंधीत विभाग प्रमुख व क्षेत्रीय अधिकारी यांनी घावी असे मनपा आयुक्त संजय कापडणीस यांनी आदेशित केले आहे.

विश्व स्वास्थ्य रक्षणार्थ सुंदरकांड पुस्तिकेचे वितरण

प्रतिनिधी, २३ मार्च

अकोला - श्री राजराजेश्वर दरबार सुंदरकांड मंडळाच्या वतीने सातत्याने सुंदरकांड उत्सव घेण्यात येत असतो. मात्र करोनाच्या सावटामुळे या सोहळ्या ऐवजी विश्व स्वास्थ्य रक्षणार्थ भाविकांनी आपापल्या घरीच प्रभू श्रीराम आणि हनुमानजी यांना प्रसन्न करण्याचे प्रसंग असलेल्या रामचरित मानस मधील पंचम सोपानचे पठाण करण्याचे आवाहन श्री राजराजेश्वर दरबार सुंदरकांड मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. मंडळाने नि:शुल्क एक हजार सुंदरकांड पुस्तकाचे वाटप केले असून मंडळाचे वीस कार्यकर्ते पन्नास भाविकांचे

समूह तयार करून आज दि. २२ मार्च रोजी स. ११रा वा. जे भाविक पाठ करतील. ते चित्रण आपापल्या मोबाईल मध्ये टिपून आपल्या ग्रुप मध्ये देवून राजेश्वर दरबार सुंदरकांड मंडळास पाठवावे. असे आवाहन राज राजेश्वर दरबार सुंदरकांड मंडळ अध्यक्ष श्यामसुंदर शर्मा, देवेंद्र तिवारी, राहुल मिश्रा, उमेश तिवारी, शैलेश चौरसिया, अतुल जोशी, गौरव रांदल, अजय शर्मा वर्णेश शर्मा, बंटी चौरसिया, नितीन गायकवाड, योगेश कस्तुरे, पंडित समीर आपाचीत आदींनी केले.

अकोटवासीयांचा जनता कर्फ्युला उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी, २३ मार्च

अकोला - कोरोनाचा संसर्ग रोखण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनाला अकोट येथील नागरिकांनी सकाळच्या वेळी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला, सकाळी ७ वाजल्यापासूनच शहरातील गजबजलेली ठिकाणे ओस पडून दिसून आली, कोरोना ला हद्दपार करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज रविवार दिनांक २२ मार्च रोजी सकाळी ७ ते रात्री ९ वाजेपर्यंत जनता कर्फ्यु चे आवाहन केले होते, याच पार्श्वभूमीवर नागरिकांनी सकाळच्या वेळीस चांगला प्रतिसाद दिला असून सर्व व्यापारी यांनी दुकाने आज रोजी बंद ठेवण्यात

आली होती, त्यामुळे स्वयंस्फुर्त संचारबंदी मुळे रस्त्यावर आणि गावात शुकशुकाट बघायला मिळाला, सकाळी मॉर्निंग वॉक ला जाणाऱ्या शेकडो नागरिकांनी पहाटे लवकर मॉर्निंग वॉक व व्यायाम करून सात च्या आत घरी जाण्यास पसंती दिली, यावेळी दूध वितरक आणि वृत्तपत्र विक्रेत्यांनी सुद्धा सकाळी सात वाजता पुर्वीच ग्राहकाच्या घरी दुध व वृत्तपत्र पोहचवली अत्यावश्यक सेवा वगळता इतर सर्व दुकाने बंद असल्यामुळे सकाळी कामाला जाणाऱ्या.

कामगाराची लगबग व गर्दी नेहमी वर्दळ असलेल्या शिवाजी चौकातील ठिकाणी दिसली नाही, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था आज रोजी बंद ठेवण्यात आल्याने, अकोट आगारातील बसेस च्या फेऱ्या सकाळ पासूनच बंद ठेवण्यात आल्या, खाजगी वाहने ऑटोरिक्षा देखील यावेळेस पहायला मिळाला नाही, कोरोनाचा संकटाची पुरेशी जाणीव असल्यामुळे नागरिकांनी घरी किंवा आहे त्या ठिकाणी थांबल्याने रस्त्यावर नागरिकांची संख्या अत्यंत नगण्य होती.

परंपरेला तिलांजली देत करोना काळात बिना गर्दीचा अंतिम संस्कार

प्रतिनिधी, २३ मार्च

अकोला - माहेश्वरी समाजातील स्थानीय न्यू भागवत प्लॉट परिसरातील रहिवाशी ८९ वर्षीय श्रीमती गोदावरीदेवी रामनाथ मुंदडा यांचे नुकतेच निधन झाले. करोनाचा संक्रमणकाळ असल्यामुळे मुंदडा परिवाराने इतर पारंपरिक खर्चिक विधी व समाजाच्या महिला-पुरुष, नातलगांना न बोलविता अत्यंत साध्या पद्धतीने गोदावरीदेवी मुंदडा यांचा अंतिम संस्कार पूर्ण केला. माहेश्वरी समाजात अंतिम संस्कार हा मुद्धा विवाहाच्या

संस्काराप्रमाणे खर्चिक संस्कार असून हा संस्कार पारंपरिक पद्धतीने समाजाच्या महिला पुरुष व नातलगांच्या गर्दीत पूर्ण केल्या जातो. मात्र मुंदडा कुटुंबाने राष्ट्रावर आलेले करोना व्हायरसचे संकट बघता प्रशासनाच्या सूचनांचे पालन करून अंतिम संस्काराला गर्दी न जमविता पुत्र व तुरळक नातलगांच्या उपस्थितीत आपल्या आईचा अंतिम संस्कार पूर्ण केला. दरम्यान आ. रणधीर सावरकर, माजी आ. हरिदास भदे, मारवाडी प्रेस गणेशोत्सव मंडळाचे मार्गदर्शक शरद चांडक, विदर्भ चेंबरचे विजय पनपालिया, नेत्रकमलांजलीचे अध्यक्ष डॉ. चंद्रकांत पनपालिया, माहेश्वरी समाजाचे अध्यक्ष रमेशचंद्र चांडक आदींनी मुंदडा यांच्या निवासस्थानी भेटी देत स्व. गोदावरीदेवी मुंदडा यांना आदरांजली वाहून कुटुंबास सांत्वना दिल्यात. यावेळी मृतकाचे पुत्र जुगलकिशोर मुंदडा, नंदकिशोर मुंदडा, सुरेश मुंदडा, अशोक मुंदडा, योगेश मुंदडा, कमलकिशोर बाहेती, जुगलकिशोर मल्ल, ब्रिजमोहन चितलांगे, रमेश बाहेती, मनोज रांदड, जयप्रकाश चांडक, प्रवीण बाहेती, राजेंद्र बाहेती, पुरुषोत्तम पनपालिया, गोपाल पनपालिया, संजय चांडक, प्रकाश पनपालिया, सुधीर रांदड, विजय राठी, प्रकाश भैय्या आदी उपस्थित होते.

अकोट शहरात मध्ये जंतुनाशक औषध फवारणीला सुरवात

प्रतिनिधी, २३ मार्च

अकोट - अकोट नगर पालिका आरोग्य विभागातर्फे कोरोना विषाणू चा प्रसार रोखण्यासाठी विविध उपाय योजना करण्यात आल्या असून. याचाच एक भाग म्हणून शहरात सार्वजनिक ठिकाणी आज जंतुनाशक औषध फवारणी करण्यात आली. कोरोनाच्या बचावासाठी नागरिकांनी विशेष काळजी घ्यावी म्हणून अकोट नगर पालिकेच्या आरोग्य विभागातर्फे स्पीकरद्वारे शहरात जनजागृती करण्यात येत आहे. त्या बरोबरच

अकोट शहरात विविध ठिकाणी फवारणी सुरवात करण्यात आली आहे. आरोग्य विभागाचे कर्मचारी यांनी आज अकोट शहरातील, शिवाजी चौक, सोनू चौक, सराफ लाइन, अकोला रोड, हिवरखेडरोड, बसस्थानक, परिसर, पोलीस स्टेशन, बँक परिसर, यासह नागरिकांची वर्दळ असलेल्या ठिकाणी ट्रॅक्टरच्या साहाय्याने जंतुनाशक औषध फवारणी केली. अकोट शहरात आज सकाळ पासूनच शहरातील मुख्य चौकात स्वच्छता केली जात असून. लाऊड स्पीकरद्वारे जनजागृती करून नागरिकांना विशेष काळजी घेण्याचे आवाहन केले जात आहे प्रशासनाच्यावतीने नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की कोरोना विषाणू बाबत घाबरून जाण्याचे कारण नाही, अकोट नगर पालिकेने प्रतिबंधात्मक अशा सर्व उपाय योजना केल्या आहेत.

बँका, पोस्ट ऑफिसेस, ए.टी.एम सेंटर साठी नियमावली जारी

प्रतिनिधी, २३ मार्च

अकोला - कोरोना विषाणू संसर्ग प्रतिबंधासाठी विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. त्या पार्श्वभुमिवर विविध बँका, पोस्ट ऑफिस येथे लोकांची होणारी गर्दी, तेथील कामकाजाचा भाग म्हणून हाताळली जाणारे पासबुक, चलनी नोटा इ. मुळे संसर्गाच्या प्रादुर्भावाची शक्यता लक्षात घेता जिल्ह्यातील सर्व बँका, पोस्ट ऑफिसेस मधील कर्मचारी अधिकारी वर्गासाठी जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर यांनी सुचना जारी केल्या आहेत. या सुचना साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये देण्यात आल्या असून त्यांचे पालन करणे बंधनकारक असल्याचे म्हटले आहे.

सुचना याप्रमाणे- १) पोस्ट ऑफिस, बँक, ए.टी.एम. येथे मुख्य प्रवेशद्वाराजवळ गार्ड नेमून काउंटरवर एका वेळी एकच ग्राहक उपस्थित असेल याची दक्षता घ्यावी. उर्वरित ग्राहकांना किमान तीन फुट लांब अंतरावर थांबवावे.

२) पैसे काढणे व कर्ज हप्ते भरणे वगळता अन्य सर्व सेवा दि. ३१ मार्च पर्यंत बंद ठेवाव्या. ३) ए.टी.एम. मशिनचे दररोज निर्जंतुकीकरण करावे. ४) बँक, पोस्ट ऑफिस मध्ये येणाऱ्या ग्राहकांचे हात धुण्यासाठी आवश्यक उपाययोजना करावी. ५) बँक इमारतींची स्वच्छता करावी. ६) अधिकाधिक ऑनलाईन व्यवहार करण्याबाबत ग्राहकांना प्रेरित करावे. या आदेशांचे उल्लंघन झाल्यास भारतीय दंड संहिता (१९६० चा ४५) कलम १८८ अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

रोजंदारी मजुरांना मजूर भत्ता व निवारा देण्याची वखारिया यांची मागणी

प्रतिनिधी, २३ मार्च

अकोला - केंद्र व राज्य शासनाने जागतिक करोना व्हायरस लागण संदर्भात राष्ट्रीय आरोग्य आणीबाणी जाहीर केली असून जनता कर्फ्यू व लॉकडाऊनने हा व्हायरस सामूहिकपणे नष्ट करण्याचा प्रयत्न सर्वत्र होत आहे. हा निर्णय योग्य असला तरी हात मजुरी करून संसार चालवणाऱ्या रोजंदारी मजूर व असंघटित क्षेत्रातील कामगारांवर यामुळे उपासमारीची पाळी आली आहे. शासनाने करोना संक्रमणकाळात या क्षेत्रातील मजूर कामगारांना एक हजार रुपये मजूर भत्ता देण्याची मागणी प्रदेश इंटक सचिव व इंटक नेते प्रदीप वखारिया यांनी केली आहे.

कोरोना व्हायरस निमित्त पंतप्रधान यांच्या भारत बंद आवाहनास सर्व भारतीयांचा प्रतिसाद असायलाच पाहिजे. रोग संक्रमण वाढू नये म्हणून शासनाने ३१ मार्च पर्यंत कामकाज बंद ठेऊन जनतेला घरात राहण्यास सांगितले आहे. या आदेशाने राज्यातील



असंघटित कामगार, ज्याचा उदरनिर्वाह रोजच्या मजुरीवर अवलंबून असतो, मजुरीवर घराची चूल पेटते. यामध्ये बांधकाम मजूर, लोहा कामगार, सेंटिंग, पेंटींग, सुतार, घरेलू महिला मजूर, बिगारी व ज्यांची कामगार आयुक्त कार्यालयात अधिकृत नोंदणी केली आहे अश्या असंघटित कामगारांना मजुरी न मिळाल्यामुळे त्यांच्या पोटापाण्याचा प्रश्न निर्माण होत आहे. तसेच राज्यात छत नसणाऱ्या हॉटेल, दुकान, खुमच्यांवर काम करणाऱ्यांची संख्याही जास्त आहे. जनता कर्फ्यू व लॉक डाऊन मुळे त्यांच्या निवाऱ्याचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे. तरी शासनाने अश्या मजूर वर्गाच्या खात्यात त्यांच्या जमा असलेला शेष फंडातुन किमान एक हजार रु मासिक देऊन औषध, राशन पाणीची व्यवस्था करावी. तसेच दिल्लीच्या धर्तीवर घर वा निवारा नसणाऱ्या मजुरांसाठी शासकीय मोकळ्या जागेत रेन बसेऱ्याची तातडीने व्यवस्था करण्याची मागणी प्रदेश इंटक सचिव व जिल्हा इंटक अध्यक्ष प्रदीप वखारिया यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी व राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना पत्राद्वारे केली आहे